॥ उषःकाल होता होता ॥

गायिकाः आशा भोसले
गीतः सुरेश भट
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

उषःकाल होता होता, काळ रात्र झाली।
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली ॥ धृ. ॥

अम्ही चार किरणांची ही आस का धरावी
जे कधीच नव्हते त्याची वाट का पहावी।
कसा सूर्या अंधाराच्या वाहतो पखाली
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली ॥ १ ॥

तिजोर्यात केले त्यांनी बंद स्वर्ग साती
आम्हावरी संसाराची उडे धूळ माती।
आम्ही ते स्मशाने ज्यांना प्रेत ही न वाली
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली ॥ २ ॥

उभा देश झाला आता एक बंदिशाला
जिथे देवकीचा पान्हा दुधाने जळाला।
कसे पुण्य दुर्दैवी अन् पाप भाग्यशाली
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली ॥ ३ ॥

धुमस्तात अजुनी विझल्या चितांचे निखारे
अजुन रक्त मागत उठती वधस्तंभ सारे।
आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली ॥ ४ ॥